ब.स.शि.प्र.मं.संचलित

कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,सोनगीर,ता.जि. धुळे

भूगोल विभाग

तोरणमाळ

सहल वृतांत
२०१९-२०२०

ब.स.शि.प्र.मं.संचलित

कला, विज्ञान महाविद्यालय,
सोनगीर, ता. जि. धुळे

भूगोल विभाग

प्रमाणपत्र

प्रमाणपत्र देण्यात आनंद होतो की, कु. धनगर सुमोध ..... ह्याने/हिने, या शैक्षणिक सहलीस उपस्थित राहून क्षेत्रीय निरीक्षणाचा उत्तम अभ्यास केला. त्या संबधी मार्च २०२० च्या परिक्षेचा अहवाल सादर केला आहे.तयार केलेल्या या अहवालाबाबत समाधानी आहोत.

सहल प्रमुख

डॉ. के. एन. साळुंखे

भूगोल विभाग प्रमुख

प्रा. एफ. एम. राठोड

प्राचार्य
कला वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय सोनगीर
ता. जि. धुळे

आभार

शैक्षणिक सहलीस सहल प्रमुख व मार्गदर्शक म्हणून लाभलेले मा. प्रा. के. एन. साळुंखे सरांनी आम्हाला प्रत्येक ठिकाणांची अभ्यास पूर्ण अशी माहिती देवून बहुमोल मार्गदर्शन केले.

आमच्या महाविद्यालयाचे प्राचार्य मा.डॉ.के.बी.पाटील यांनी सहलीस परवानगी देवून बहुमोल सहकार्य केले. डॉ. **के.एन. साळुंखे** व **प्रा.व्ही.डी.पाटील** यांनी ही सहलीच्या अयोजनाबाबत विशेष सहकार्य केले, या सर्व मान्यवरांचे आभारी आहोत.



प्रास्ताविक

भूगोल विषयाच्या क्षेत्रीय अभ्यासाला फार महत्व असते. त्याशिवाय भूगोल विषयाचा अभ्यास पुर्ण होवू शकत नाही. कारण एखाद्या ठिकाणाच्या भौगोलिक अभ्यास करण्यासाठी भूगोल विषयाच्या अभ्यासकाला प्रत्यक्ष त्याठिकाणी गेल्याशिवाय काही संकल्पना स्पष्ट होवू शकत नाही. तेथे जाऊन प्रत्यक्ष पाहिल्यावर व त्याची अनुभूती घेतल्यावर काही संकल्पना चांगल्या पध्दतीने समजून घेता येतात.

उदा. त्या ठिकाणाचे स्थान, प्राकृतिक रचना, हवामान, खडकाचा प्रकार, जमिनीचा प्रकार, वनस्पती, प्राणी व मानवी जीवन इ. गोष्टींचा अभ्यास समजुन घेण्यासाठी प्रत्यक्ष त्या ठिकाणाला भेट देणे इष्ट असते.

भूगोल विषयाच्या अभ्यासातील या अभ्यास पध्दतीच्या अनुषंगाने विद्यापीठाने व्दितीय व तृतीय वर्ष कला विशेष भूगोल विषयाच्या अभ्यासक्रमात शैक्षणिक सहलीचा अंतर्भाव करण्यामागे एखाद्या ठिकाणाल भेट देणे व क्षेत्रीय अभ्यास करणे हा उद्देश डोळयापुढे ठेवुन आम्ही तोरणमाळ या महाराष्ट्रातील नं. दोनचे थंडहवेचे ठिकाणांचा भौगोलिक अभ्यास करण्याच्या हेतुने भेट देण्याचे ठरविले. ११ जानेवारी २०२० रोजी आम्ही या ठिकाणांना भेटी देवून तेथील भौगोलिक माहिती व त्याचप्रमाणे त्या ठिकाणांना लाभलेली, अध्यात्मिक, ऐतिहासिक, सांस्कृतिक पार्श्वभुमी समजून घेण्याचा प्रयत्न केला व त्यानुसार हा सहल वृत्तांत देत आहोत.

सहलीचे महत्व

सहलीपासून व्यक्तीला फार मोठी अनुभूती मिळते. ज्या स्थळांना आपण भेट देतो त्या स्थळांचे नैसर्गिक सौंदर्य, ऐतिहासिक, पार्श्वभूमी, भौगोलिक पार्श्वभुमी व महत्व, त्या स्थळांचे वातावरण याची माहिती पूर्णपणे मिळते.

संपूर्ण जग म्हणजे भूगोल विषयाची प्रंचड मोठी प्रयोग शाळा आहे. यात भुमी, जल व आकाश या तिन्ही गोष्टींचा समावेश हा भूगोल विषयात होतो. भूगोलांतील प्रात्यक्षिक म्हणजे प्रत्यक्ष पाहणी होय. भूगोलात जर एखादा प्रदेशाचा लोकसंख्या, रितीरिवाज, लोकांचे राहणीमान, उद्योगधंदे, व्यापार, दळणवळण, वाहतुक, इ. गोष्टींना भूगोलात फार महत्व दिले जाते. तसेच कोणत्याही विषयात प्रदेशात अभ्यास करावयाचा असेल तर पुस्तके वाचून त्याचा अभ्यास परीपूर्ण होण्यासाठी त्या स्थळांना प्रत्यक्ष भेट दिल्यास म्हणजे प्रत्यक्ष डोळयांनी बघीतल्यास, त्या गोष्टींचे त्वरीत आकलन होते व ती गोष्ट अधिक लक्षात येते.



सहल वृत्तांत

❖ प्रस्तावना :

तोरणमाळ हे महाराष्ट्रातील क्रंमाक दोनचे थंड हवेचे प्रसिध्द ठिकाण आहे. हे ठिकाण महाराष्ट्रातील नंदुरबार जिल्ह्यातील शहादा तालुक्यात उत्तरेला आहे. याची उंची समुद्र सपाटीपासुन ११६१ मीटर इतक्या उंची वरिल निसर्ग रम्य व शांत असे ठिकाण आहे. तोरणमाळ या ठिकाणाचा अंक्षाश विस्तार २१°५३' मीनीट उत्तर ते २१° ८८' उत्तर व ७४° २८' पूर्व ते ७४° ४६'.पूर्व इतका आहे. तोरणमाळ हा परिसर जवळ - जवळ ४१.४३ वर्ग किलो मीटर (१६ वर्गमैल) एवढ्या परिसरात पसरलेला आहे.



❖ यशवंत तलाव - महाराष्ट्र राज्याची निर्मिती म्हणजे 1960 ते 1970 या दशकातील गोष्ट. पूर्वी तोरणमाळ हे स्थळ आज इतके विकसित झाले नव्हते. त्या वेळी चांगले रस्तेही नव्हते. किर्र घनदाट जंगलातून येथे पोहोचावे लागे. तोरणमाळ उत्तम निसर्गरम्य स्थळ असल्याचे कुणीतरी त्यावेळचे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांना स्थानमाहात्म्य सांगितले होते. यशवंतराव चव्हाण यांचा शहादा दौरा होता. या दौऱ्यात त्यांनी आपल्याला कितीही कष्ट पुरले तरी तोरणमाळ येथे जाण्याचे निश्चित केले. शहादे येथून ऍम्बेसेडरने चांगला रस्ता असेपर्यंत प्रवास केला व 20 कि. मी. अंतर घोड्यावर रपेट करून तलावापर्यंत पोहोचले. निसर्गाचा अद्‌भुत चमत्कार पाहून ते भारावले, तृप्त झाले. या निसर्गरम्य स्थळी यशवंतराव चांगले रमले त्यांनी दिलेल्या भेटीमुळे तोरणमाळ विकासाला चालना मिळाली. त्यांची आठवण म्हणून या तलावाचे नामकरण यशवंत तलाव झाले.



हा प्रसंग शहादे येथील निसर्गप्रेमी हरियालीचे संस्थापक हैदरभाई नुरानी यांनी सांगितले. या तलावाचे शुद्ध पाणी, विविध जलचर प्राणी, पक्षी यांचे वास्तव्य पर्यटकांचे लक्ष वेधून घेते. या तलावाच्या अवतीभवती निरनिराळे वृक्ष आहेत. तलावाजवळ एक छोटे पुरातन महादेवाचे मंदिरदेखील आहे. या तलावात पॉन्ड हाऊस बांधण्याचे तसेच बोटिंगची व्यवस्था करण्याचे विचाराधीन आहे. नौकायन, फिशिंगची सुविधा उपलब्ध झाल्यावर पर्यटनाला अजून चालना मिळेल. यशवंत तलावाच्या जवळच दीड कि. मी. अंतरावर सीताखाई उत्तम पॉइंट आहे.

❖ **सीताखाई** - दोन डोंगरांच्या मध्ये असलेल्या 400 फुटांपेक्षा अधिक खोल दरी असलेला भाग म्हणजे सीताखाई. या दरीचा बराचसा भाग काळ्या टणक दगडाने वेढलेला आहे. या दगडावर वाढणाऱ्या वनस्पती, रानफुलांचा बहर असलेला नजारा येथे बघायला मिळतो. सीताखाईच्या ठराविक पॉइंटला उभे राहण्याची व्यवस्था केली आहे. कठड्याशेजारी उभे राहून आरोळी मारली तर काही सेकंदांनी तसाच प्रतिध्वनी आपल्याला ऐकू येतो. त्याची मजा घेणं काही वेगळेच असते. सीताखाईपासून हाकेच्या अंतरावर पूर्वेच्या दिशेने सनराईज व पश्चिमेच्या दिशेने सनसेट पॉइंट आहेत. सूर्योदय व सूर्यास्ताचे दर्शन चांगल्या प्रकारे घडते.

❖ औषधी वनस्पतीचा पार्क :

या ठिकाणी जवळ-जवळ 0.5 हेक्टर क्षेत्रात ६० प्रकारच्या वन औषधी असुन त्यांच्या विविध प्रजाती विविध आजारांसाठी उपयुक्तता व त्यांच्या संवर्धनासाठी सुचना फलके लावलेले आहेत. या सगळ्या वन औषधी या सातपुड्याच्या तोरणमाळ परिसरातुन संकलित करण्यात आलेल्या आहेत. वनस्पतीशास्त्र, औषध निर्माणशास्त्र यांचा अभ्यास करणा-या विद्यार्थ्यांना अत्यंत उपयुक्त माहिती येथे उपलब्ध आहे.

❖ कमल तलाव:

सिताखाईच्या रस्त्याकडे जातांना एक छोटेसे तलाव लागते.या तलावात जांभळ्या रंगाचे कमळाचे फुले पर्यटकाचे लक्ष वेधुन घेतात. हा तलाव डिसेंबर महिन्यानंतर कोरडा पडतो.

❖ खडकी पॉईंट



या ठिकाणा वरुन आदिवासी लोकांच्या वसाहती लहान - लहान झोपड्यांच्या स्वरुपात, पर्वतांचा रांगांच्या दुवाबात वसवलेल्या दिसतात. या ठिकाणी खडकी नावाचा आदिवासींचे एका गावाचे विहंगम दृष्य दिसते. त्याच प्रमाणे झकाल नावाचे नदिचे दृष्य दिसते.

❖ सुर्यास्ताचा देखावा:

या ठिकाणावरुन दररोज संध्याकाळी सुर्य मावळतीला येतांना क्षितीजाचे आकर्षित विहंगम देखावा पाहावयास मिळतो. येथील पर्यटकांसाठी हे एक सर्वात आकर्षणाचे हे स्थळ आहे.

❖ आमदरी पॉईट

या ठिकाणावरुन पर्वतावर पर्वत उंचावल्यासारखे विहंगम अशा प्रकारचे दृष्य पाहावयास मिळते. त्यामुळे काही ठिकाणी पर्वतांच्या बाजु अत्यंत तीव्र उताराच्या काही बाजु पाय-या पाय-यांच्या उतारासारख्या दिसतात. या ठिकाणी आमदरी नावाचा आदिवासींचा पाडा असुन त्यावरुन आमदरी पॉईट नाव पडले आहे.

❖ मुलांचे पार्क:

या ठिकाणी यशवंत तलावाच्या काठावर मुलांसाठी छान असा बगिचा तयार केला असुन या ठिकाणी जवळ-जवळ ३० रंगी बेरंगी खेळाचे साहित्य ठेवण्यात आलेले आहे. त्यामुळे हा बगिचा लहान मुलासाठी आकर्षणाचे स्थळ बनलेले आहे.

❖ मच्छींद्र नाथांची गुहा:

या ठिकाणी तोरणमाळ पठाराच्या दक्षिणेस सर्वात उंच स्थळी पर्वताच्या कपारीत अत्यंत दुर्गम अशा ठिकाणी मच्छीद्रनाथांची गुहा आहे. प्राचीन काळी या ठिकाणी मच्छेंन्द्रनाथाचे वास्तव्य असावे. म्हणुन या ठिकाणी पवित्र धार्मिक स्थळ निर्माण झाले आहे. ही गुहा अत्यंत खोल व निमुळती असुन या ठिकाणी गुहेत शिरणे फार कष्टप्रद आहे. गुहेच्या समोर अत्यंत खोल अशा प्रकारची खाई असुन

तेथुन आजु बाजुच्या प्रदेशातील घनदात जंगलाचा प्रदेश व जंगलातील पाऊल वाटांचे निसर्गरम्य दृश्य दिसते.

❖ सात पायरी देखावा:

नागार्जुन मंदिराच्याजवळ एक सात पायरी घाट नावाचे ठिकाण असुन एक रहस्य मय अशा प्रकारचा अनुभव येतो. तो म्हणजे तोरणमाळ पठारावर जाणारा रस्ता हा जवळ-जवळ सात ठिकाणी पर्वतांच्या सुळक्या वरुन रस्त्याचे नागमोळी वळणे एकाच ठिकाणावरुन आपल्याला पहावयास मिळतात.



❖ नागार्जुन पॉईट:

सात पायरी पॉईच्या जवळ रस्त्याला लागुन पर्वताच्या गुहेत नागार्जुनाच्या मंदिरा समोर या ठिकाणावरुन तोरणमाळ पठाराचे व आजुबाजुच्या पर्वतांचे धुसर अशा प्रकारची देखावा दिसतो.

****